# जिव्हाळा फाउंडेशनतर्फे रेशीमबाग मैदानावर वृक्षारोपण

**नागपूर, ता.२५ :** जिव्हाळा फाउंडेशनतर्फे आ. गिरीश व्यास यांच्या हस्ते रेशीमबाग मैदान येथे वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना आ. गिरीश व्यास यांनी संस्थेच्या माध्यमातून मागील चार वर्षापासून सुरू असलेल्या विविध उपक्रमाबद्दल सांगितले. ते म्हणाले, ही संस्था दरवर्षी वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन सुध्दा करते.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रा. स्व. संघाचे भागसंघचालक अशोक भुजवणे , माजी नगरसेवक नेताजी गजभिये , ॲड. मोहन वाघमारे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष मनीष मेश्राम , सचिव तुषार महाजन , चंदू धांडे, विनोद कोटांगळे , डॉ सुमित पैडलवार , करण लखपती , अशोक डोंगरे , उदय झोडे, मयूर शेंडे , नितीन कठाणे , स्वरूप कोडमलवार , अंगद जरुळकर , रिद्दु चोले, नितेश समर्थ , केतन साठवणे,साहिल शरनागत, योगेश मधूमटके , अक्षय ठाकरे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन मिथुन हटवार यांनी केले. आभार विलास मसरे यांनी मानले.